**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३१२०/२०२४**
**भैरवनाथ वि. राजेंद्र गावडे**
**निशाणी क्र.१४ लगत**

**फिर्यादीचा पुढील सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.ए.शिंदे यांचेमार्फत सुरु–**

आता मला संचिकेवर दाखल माझे पुराव्याचे शपथपत्र दाखवण्यात आले. त्यास **निशाणी १४** देण्यात येत आहे. आता मला संचिकेवर दाखल धनादेश दाखवण्यात आला. तो मला आरोपीने दिलेला होता. सदर धनादेशास **निशाणी १९** देण्यात येते. सदरचा धनादेश मी बारामती सहकारी बँक लि., शाखा फलटण येथे दिनांक ०१.१०.२०२४ रोजी भरला होता. त्याची पावती मी दाखल केली आहे. सदर पावतीला **निशाणी २०** देण्यात येते. सदरचा धनादेश हा अनादरीत झाला त्याचा बँकेचा मेमो मी दाखल केला आहे. सदर मेमोला **निशाणी २१** देण्यात येते. मी आरोपीस धनादेशाच्या पैशाची मागणी करण्यासाठी दिनांक १४.१०.२०२४ रोजी रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवली. त्याची स्थळप्रत मी दाखल केली आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर नोटीसला **निशाणी २२** देण्यात येत आहे. सदर नोटीस ही आरोपीस मिळाल्याची पोहोच पावती मी दाखल केली आहे. त्यास **निशाणी २३** देण्यात येते. आरोपीचा आमच्या पतसंस्थेचा कर्ज खात्याचा उतारा दाखल केला आहे. (कर्जखात्याचे मुळ लेजर बुक न्यायालयात पडताळणीसाठी सादर करण्यात आले. न्यायालयाने सदर लेजरबुक प्रमाणे संचिकेवर दाखल केलेल्या खाते उता–याच्या सर्व नोंदी बरोबर असल्याची खात्री केली व त्यामुळे सदर उता–याला निशाणी देण्यात येत आहे.) सदर कर्जखाते उता–यास **नि.क्र.२४** देण्यात येत आहे.

**आरोपी व त्याचे वकिलांचा पुकारा केला असता गैरहजर. करीता, उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए.एस.साटोटे)

दि.०९.०६.२०२६ ३रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण